## MAHARASHTRA ACT No. XXXVIII OF 1965

THE AGRICULTURISTS' LOANS (MAHARASHTRA AMENDMENT) ACT, 1965.

महाराष्ट्र विधान मंडळाच्या पुढील अधिनियमास राज्यपाल यांची संमती दिनांक २८ ऑगस्ट १९६५ रोजी मिळालेली असल्यामुळे तो याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**बी. पी. दलाल,**
सचिव, महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. XXXVIII OF 1965

AN ACT FURTHER TO AMEND THE AGRICULTURISTS' LOANS ACT, 1884, IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA.

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८ (राज्यपाल यांची संमती मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दिनांक ४ सप्टेंबर १९६५ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला.)

**महाराष्ट्र राज्यास लागू असलेला, कृषिक कर्ज अधिनियम, १८८४ मध्ये आणखी दुरुस्ती करण्याबाबत अधिनियम.**

ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्यास लागू असलेला, कृषिक कर्ज अधिनियम, १८८४ यात, यापुढे दिलेल्या प्रयोजनासाठी आणखी दुरुस्ती करणे इष्ट आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या सोळाव्या वर्षी, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

१. या अधिनियमास, कृषिक कर्ज (महाराष्ट्र दुरुस्ती) अधिनियम, १९६५, असे म्हणावे. लघु संज्ञा.

२. महाराष्ट्र राज्यास लागू असलेला, कृषिक कर्ज अधिनियम, १८८४ याच्या कलम ४, पोट-कलम (१) मधील, "घर बांधण्यासाठी" या मजकुराऐवजी, "घरासाठी जमीन विकत घेण्यासाठी किंवा घरे बांधण्यासाठी" हा मजकूर दाखल करण्यात येईल. सन १८८४चा अधिनियम क्रमांक १२ याच्या कलम ४ ची दुरुस्ती.

(यथार्थ अनुवाद)
**वा. ना. पंडित,**
भाषा संचालक, महाराष्ट्र शासन.

## MAHARASHTRA ACT No. XXXIX OF 1965

## THE BOMBAY PUBLIC TRUSTS (AMENDMENT) ACT, 1965

महाराष्ट्र विधान मंडळाच्या पुढील अधिनियमास राज्यपाल यांची संमती दिनांक २८ ऑगस्ट १९६५ रोजी मिळालेली असल्यामुळे तो याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

बी. पी. दलाल,

सचिव, महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. XXXIX OF 1965

## AN ACT FURTHER TO AMEND THE BOMBAY PUBLIC TRUSTS ACT, 1950.

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३९ (राज्यपाल यांची संमती मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दिनांक ४ सप्टेंबर १९६५ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला.)

**मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० यात आणखी दुरुस्ती करण्याबाबत अधिनियम.**

ज्याअर्थी, मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० यात, यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी आणखी दुरुस्ती करणे इष्ट आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या सोळाव्या वर्षी, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

१. या अधिनियमास, मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (दुरुस्ती) अधिनियम, १९६५ असे म्हणावे. लघु संज्ञा.

२. मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० (ज्याचा यात यापुढे "मुख्य अधिनियम" असा उल्लेख करण्यात आला आहे) याच्या कलम २२ मध्ये,— सन १९५०चा मुंबई अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम २२ ची दुरुस्ती.

(अ) पोट-कलम (३) मध्ये,—

(एक) "फेरबदल घडून आला आहे" या मजकुरानंतर, "किंवा फेरबदल केल्यामुळे जर विश्वस्तव्यवस्थेचे प्रशासन कार्यालय आणि विश्वस्तव्यवस्थेची सबंध मालमत्ता ही राज्यात अस्तित्वात असण्याचे बंद झाले असेल व त्यामुळे विश्वस्तव्यवस्थेचे नाव नोंदणीपुस्तकातून काढून टाकण्यात आले पाहिजे" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल;

(दोन) "नोंदी सुधारल्या पाहिजेत" या मजकुराऐवजी "नोंदी दुरुस्त केल्या पाहिजेत किंवा वगळल्या पाहिजेत" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(तीन) "मात्र फेरबदल घडून आल्यास" या मजकुराऐवजी "मात्र फेरबदल घडून आल्यास किंवा कोणत्याही नोंदी रद्द केल्यास" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(ब) पोट-कलम (४) मध्ये,—

(एक) "नोंदीत सुधारणा करण्यात येईल" या मजकुरानंतर "किंवा नोंदणीपुस्तकातून विश्वस्तव्यवस्था काढून टाकण्यात येईल" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ; आणि

(दोन) "सुधारलेली नोंद" या मजकुरानंतर "किंवा नोंदणीपुस्तकातून विश्वस्तव्यवस्था काढून टाकल्याचे" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

सन १९५०चा मुंबई अधिनियम क्रमांक २९ याचे कलम ६८ ची दुरुस्ती.

३. मुख्य अधिनियमाचे कलम ६८ यातील खंड (क) मध्ये "उक्त नोंदीमध्ये सुधारणा करणे" या मजकुरानंतर "किंवा नोंदी रद्द करणे" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

(यथार्थ अनुवाद)

**वा. ना. पंडित,**

भाषा संचालक, महाराष्ट्र शासन.